Email – addlcp.traffic@mahapolice.gov.in
दूरध्वनी क्रमांक – ०२२-२४९२४७३४

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
मुंबई पोलीस



अपर पोलीस आयुक्त, वाहतूक, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

वाहतूक पोलीस मुख्यालय, ८७, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई – ४०००३०.

जा. क्र. - ३७१ /अपोआ/वाहतूक/वा./कायमस्वरूपी अधिसूचना/२६, दिनांक – १६/११/२०२६

कायमस्वरूपी अधिसूचना / आदेश

अधिसूचना क्रमांक - २३१ /अपोआ/वाहतूक/वा./कायमस्वरूपी अधिसूचना/२६, दिनांक – १६/११/२०२६

ज्याअर्थी, वाकोला वाहतूक विभागाच्या हद्दीतील पश्चिम द्रुतगती महामार्गावरील विलेपार्ले जंक्शन येथून आदर हॉटेल जंक्शन व दयालदास रोडमार्गे सांताक्रुज (पश्चिम) कडे जाणाऱ्या वाहनांची संख्या मोठी असून दयालदास रोड रुंदीने कमी असल्याने वाहने संथ गतीने जातात. एअरपोर्ट मेट्रो स्टेशनकडून धोंडे रोडने येणारी काही वाहने दयालदास रोडवर उजवे वळण घेऊन नेहरू रोडने विलेपार्ले (पूर्व) कडे जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आदर हॉटेल जंक्शन येथे वाहतूक कोंडी होऊन सायंकाळच्या गर्दीच्या वेळी तिचा परिणाम विलेपार्ले जंक्शन व पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या दक्षिण वाहिनीवरील वाहतुकीवर होत आहे.

आणि ज्याअर्थी, सदर ठिकाणची वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आदर हॉटेल जंक्शन ते ठक्कर स्कूल हा मार्ग एक दिशा मार्ग म्हणून घोषित करणे आवश्यक आहे, असे माझे मत झाले आहे.

त्याअर्थी, मी, मोक्षदा पाटील, अपर पोलीस आयुक्त, वाहतूक, मुंबई, मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम ११५ तसेच केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ५९ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून तसेच शासन निर्णय क्रमांक एमव्हीए-०५८९/प्र.क्र.१०६१/टीआर-२, दिनांक १९/०५/१९८९, एम.जी.जी. भाग ४-अ, दिनांक २०/०९/१९९० व शासन निर्णय क्रमांक एमव्हीए-००१९६/८७१/प्र.क्र.३७/सीआर-२, दिनांक २७/०९/१९९६, एम.जी.जी. भाग १-व्ही-अ (असाधारण) क्रमांक ३०७ अन्वये अधिसूचना निर्गमित दिनांकापासून खालीलप्रमाणे वाहतूक निर्बंध लागू करीत आहे :–

'एक दिशा मार्ग' व 'प्रवेश बंदी'

१. वाकोला वाहतूक विभागाच्या हद्दीतील दयालदास रोडवरील आदर हॉटेल जंक्शन ते ठक्कर स्कूल हा मार्ग आदर हॉटेल जंक्शनकडून ठक्कर स्कूलकडे जाणारा एक दिशा मार्ग राहील.
२. एअरपोर्ट मेट्रो स्टेशनकडून धोंडे रोडने येणाऱ्या वाहनांना दयालदास रोडवर उजवे वळण घेऊन आदर हॉटेल जंक्शन, नेहरू रोडने विलेपार्ले (पूर्व) कडे जाण्यास बंदी राहील.
३. ठक्कर स्कूलकडून दयालदास रोडने आदर हॉटेल जंक्शन, नेहरू रोडकडे जाण्यास बंदी राहील.

पर्यायी मार्ग

१. एअरपोर्ट मेट्रो स्टेशनकडून नेहरू रोडकडे जाण्यासाठी वाहने पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या उत्तर वाहिनी सेवा रस्त्याने सरळ विलेपार्ले जंक्शन येथे येऊन डावे वळण घेऊन नेहरू रोडने इच्छित स्थळी जातील.

२. ठक्कर स्कूलकडून नेहरू रोडमार्गे विलेपार्ले पूर्वकडे जाणारी वाहने धोंडे रोड, एव्हियन हॉटेलमार्गे विलेपार्ले जंक्शन येथे येऊन पुढे इच्छित स्थळी जातील.

ही अधिसूचना पोलीस, अग्निशमन दल, रुग्णवाहिका, अत्यावश्यक सेवेतील वाहने व स्थानिक रहिवाशी यांच्या दूचाकी वाहनांना लागू राहणार नाही.

सदर अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध मोटार वाहन अधिनियम, १९८८ तसेच इतर लागू असलेल्या कायद्यांनुसार योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

ही अधिसूचना माझ्या शिक्क्यासह व स्वाक्षरीसह दि. १६/११/२०२६ रोजी मुंबई येथे जारी करण्यात येत आहे.

अपर पोलीस आयुक्त (वाहतूक) मुंबई

(मोक्षदा पाटील) भा.पो.से.
अपर पोलीस आयुक्त, वाहतूक
मुंबई शहर

Email – addlcp.traffic@mahapolice.gov.in
Phone Number –022-24924734

Govt. of
Maharashtra
Home Department
Mumbai Police



Office of the Additional Commissioner of Police, Traffic, Mumbai
Traffic Police Headquarters, 87, Sir Pochkhanwala Road, Worli, Mumbai - 400030

Outward No. 374 /TRF/Addl CP./R/Permanent Notification/2026, Dated: 16 /11/2026

PERMANENT NOTIFICATION / ORDER

Notification No. 231 /TRF/Addl CP./R/Permanent Notification/2026, Dated: 16 /11/2026

WHEREAS, the number of vehicles proceeding from Vile Parle Junction on the Western Express Highway via Adar Hotel Junction and Dayaldas Road towards Santacruz (West) is large, and as Dayaldas Road is narrow, vehicles move slowly. Further, some vehicles coming from Airport Metro Station via Dhonde Road take a right turn onto Dayaldas Road and proceed towards Nehru Road, Vile Parle (East). This causes traffic congestion at Adar Hotel Junction, which, during the evening peak hours, affects traffic at Vile Parle Junction and on the southbound carriageway of the Western Express Highway;

AND WHEREAS, I am of the opinion that, to keep traffic moving smoothly at this location, it is necessary to declare the stretch from Adar Hotel Junction to Thakkar School as a one way;

NOW, THEREFORE, I, Mokshada Patil, Additional Commissioner of Police, Traffic, Mumbai, in exercise of the powers conferred upon me under Section 115 of the Motor Vehicles Act, 1988, read with Rule 59 of the Central Motor Vehicles Rules, 1989, and in accordance with Government Resolution No. MVA-0589/CR-1061/TR-2, dated 19/05/1989, published in M.G.G. Part IV-A dated 20/09/1990, and Government Resolution No. MVA-00196/871/CR-37/CR-2, dated 27/09/1996, published in M.G.G. Part I-V-A (Extraordinary), No. 307, hereby impose the following traffic restrictions with effect from the date of issuance of this notification:

ONE WAY AND NO ENTRY RESTRICTION

1. The stretch of Dayaldas Road from Adar Hotel Junction to Thakkar School, within the jurisdiction of Vakola Traffic Division, shall be one way towards Thakkar School.
2. Vehicles coming from Airport Metro Station via Dhonde Road are prohibited from taking a right turn onto Dayaldas Road and proceeding towards Adar Hotel Junction and Nehru Road, Vile Parle (East).
3. Vehicles are prohibited from proceeding from Thakkar School via Dayaldas Road towards Adar Hotel Junction and Nehru Road.

ALTERNATIVE ROUTES

1. Vehicles proceeding from Airport Metro Station towards Nehru Road shall proceed straight along the Northbound Service Road of the Western Express Highway, reach Vile Parle Junction, take a left turn and proceed along Nehru Road towards their respective destinations.
2. Vehicles proceeding from Thakkar School towards Vile Parle (East) via Nehru Road shall take Dhonde Road, proceed via Avion Hotel, reach Vile Parle Junction and continue towards their respective destinations.

Exemption:

This notification shall not apply to Police vehicles, Fire Brigade vehicles, Ambulances, vehicles engaged in essential services, and two-wheelers belonging to local residents.

Motorists violating this notification shall be liable to appropriate legal action under the Motor Vehicles Act, 1988 and other applicable laws.

This notification is issued under my hand and seal at Mumbai on this 16 day of November, 2026.

Addl Commissioner of Police Mumbai

(Mokshada Patil) IPS
Additional Commissioner of Police,
Traffic, Mumbai.

Email - addlcp.traffic@mahapolice.gov.in
दूरध्वनी क्रमांक – ०२२-२४९२४७३४

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
मुंबई पोलीस



अपर पोलीस आयुक्त, वाहतूक, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

वाहतूक पोलीस मुख्यालय, ८७, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई – ४०००३०.

जा. क्र. - ३७१ /अपोआ/वाहतूक/वा./कायमस्वरूपी अधिसूचना/२६, दिनांक – १६/११/२०२६

:: वार्तापत्र ::

वाकोला वाहतूक विभागाच्या हद्दीतील पश्चिम द्रुतगती महामार्गावरील विलेपार्ले जंक्शन येथून आदर हॉटेल जंक्शन व दयालदास रोडमार्गे सांताक्रुज (पश्चिम) कडे जाणाऱ्या वाहनांची संख्या मोठी आहे. दयालदास रोड रुंदीने कमी असून धोंडे रोडने येऊन दयालदास रोडवर उजवे वळण घेणाऱ्या वाहनांमुळे आदर हॉटेल जंक्शन येथे वाहतूक कोंडी होते. सायंकाळच्या गर्दीच्या वेळी तिचा परिणाम विलेपार्ले जंक्शन व पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या दक्षिण वाहिनीवरील वाहतुकीवर होत आहे. त्यामुळे अधिसूचना निर्गमित दिनांकापासून कायमस्वरूपी खालीलप्रमाणे वाहतूक निर्बंध लागू करण्यात येत आहेत.

निर्बंध :

१. वाकोला वाहतूक विभागाच्या हद्दीतील दयालदास रोडवरील आदर हॉटेल जंक्शन ते ठक्कर स्कूल हा मार्ग आदर हॉटेल जंक्शनकडून ठक्कर स्कूलकडे जाणारा एक दिशा मार्ग राहील.
२. एअरपोर्ट मेट्रो स्टेशनकडून धोंडे रोडने येणाऱ्या वाहनांना दयालदास रोडवर उजवे वळण घेऊन आदर हॉटेल जंक्शन, नेहरू रोडने विलेपार्ले (पूर्व) कडे जाण्यास बंदी राहील.
३. ठक्कर स्कूलकडून दयालदास रोडने आदर हॉटेल जंक्शन, नेहरू रोडकडे जाण्यास बंदी राहील.

पर्यायी मार्ग :

१. एअरपोर्ट मेट्रो स्टेशनकडून नेहरू रोडकडे जाण्यासाठी वाहने पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या उत्तर वाहिनी सेवा रस्त्याने सरळ विलेपार्ले जंक्शन येथे येऊन डावे वळण घेऊन नेहरू रोडने इच्छित स्थळी जातील.
२. ठक्कर स्कूलकडून नेहरू रोडमार्गे विलेपार्ले पूर्वकडे जाणारी वाहने धोंडे रोड, एव्हियन हॉटेलमार्गे विलेपार्ले जंक्शन येथे येऊन पुढे इच्छित स्थळी जातील.

ही अधिसूचना पोलीस, अग्निशमन दल, रुग्णवाहिका, अत्यावश्यक सेवेतील वाहने व स्थानिक रहिवाशी यांच्या दूचाकी वाहनांना लागू राहणार नाही.

वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, वाहतूक चिन्हे व वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांच्या सूचनांचे पालन करावे आणि वाहतूक पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

अपर पोलीस आयुक्त (वाहतूक) मुंबई

(मोक्षदा पाटील) भा.पो.से.
अपर पोलीस आयुक्त, वाहतूक
मुंबई शहर

Email – addlcp.traffic@mahapolice.gov.in
Phone Number -022-24924734

Govt. of
Maharashtra
Home Department
Mumbai Police



Office of the Additional Commissioner of Police, Traffic, Mumbai

Traffic Police Headquarters, 87, Sir Pochkhanwala Road, Worli, Mumbai - 400030

Outward No. 374 /TRF/Addl CP./R/Permanent Notification/2026, Dated: 16 /11/2026

:: PRESS NOTE ::

The number of vehicles proceeding from Vile Parle Junction on the Western Express Highway via Adar Hotel Junction and Dayaldas Road towards Santacruz (West), within the jurisdiction of Vakola Traffic Division, is large. Dayaldas Road is narrow, and vehicles coming via Dhonde Road and taking a right turn onto Dayaldas Road cause traffic congestion at Adar Hotel Junction. During the evening peak hours, this affects traffic at Vile Parle Junction and on the southbound carriageway of the Western Express Highway.

Therefore, the following traffic restrictions are being imposed permanently with effect from the date of issuance of the notification.

Restrictions:

1. The stretch of Dayaldas Road from Adar Hotel Junction to Thakkar School, within the jurisdiction of Vakola Traffic Division, shall be one way towards Thakkar School.
2. Vehicles coming from Airport Metro Station via Dhonde Road are prohibited from taking a right turn onto Dayaldas Road and proceeding via Adar Hotel Junction and Nehru Road towards Vile Parle (East).
3. Vehicles are prohibited from proceeding from Thakkar School via Dayaldas Road towards Adar Hotel Junction and Nehru Road.

Alternative Routes:

1. Vehicles proceeding from Airport Metro Station towards Nehru Road shall proceed straight along the Northbound Service Road of the Western Express Highway, reach Vile Parle Junction, take a left turn and proceed along Nehru Road towards their respective destinations.
2. Vehicles proceeding from Thakkar School towards Vile Parle (East) via Nehru Road shall take Dhonde Road, proceed via Avion Hotel, reach Vile Parle Junction and continue towards their respective destinations.

Exemption:

This notification shall not apply to Police vehicles, Fire Brigade vehicles, Ambulances, vehicles engaged in essential services, and two-wheelers belonging to local residents.

All motorists are requested to cooperate with the traffic police, follow the instructions and use alternative routes to avoid inconvenience.

Addl Commissioner of Police Mumbai

(Mokshada Patil) IPS
Additional Commissioner of Police,
Traffic, Mumbai.